राज्य शासकीय कर्मचारी/अधिकारी यांना
सातव्या वेतन आयोगाप्रमाणे तीन लाभांची
सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना
अनुज्ञेय करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय,लेखा व कोषागारे,
कस्तुरी इमारत, जे. टाटा मार्ग, पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०.
दुरध्वनीक्र. ०२२-२२८८०१०८ Email Id - admin-dat@mah.gov.in संकेतस्थळ:- www.mahakosh.gov.in

वाचा -

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र,एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, दि.०८.०६.१९९५
२. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दि.२०.०७.२००१
३. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन २००२/प्र.क्र.१/सेवा-३, दि.११.०१.२००२
४. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४३/सेवा-३, दि.३१.०८.२००९
५. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४४/९९/सेवा-३, दि.०१.०४.२०१०
६. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन ११११/प्र.क्र.८/सेवा-३, दि.०१.०७.२०११
७. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.आप्रयो-१०१२/प्र.क्र.७१/सेवा-३, दि.१९.०१.२०१३
८. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.वेतन ११११/प्र.क्र.८/सेवा-३, दि.०९.१२.२०१६
९. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.आप्रयो-१०१५/प्र.क्र.१११/२०१५/सेवा-३, दि.२३.१२.२०१५
१०. शासन शुध्दीपत्रक वित्त विभाग क्र.वेतन-११११/प्र.क्र.०८/सेवा-३, दि.११.०५.२०१७
११. शासन निर्णय,वित्त विभाग, क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३ दि.०२.०३.२०१९
१२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन-१२, दि.०१.०८.२०१९
१३. वित्त विभागाचे पत्र क्र.वेतन-२०१९/प्र.क्र.१२५/सेवा-३, दि.१०.१२.२०१९
१४. वित्त विभागाचे पत्र क्र.वेतन-१११०/प्र.क्र.८/सेवा-३, दि.०२.११.२०२०

---

क्र.संलेको २०२५/प्रशा-राप/सुसेआप्रयो/ले अ/614 दिनांक :- 18 JUN 2025

## -: आदेश :-

सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार शासकीय कर्मचारी/ अधिका-यांना १०,२० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतरची तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना वित्त विभागाच्या दि.०२.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.०१.०१.२०१६ पासून अनुज्ञेय करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयामधील नमूद तरतुदीनुसार, सातव्या आयोगामध्ये तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२० पर्यत वेतन घेणाऱ्या (सहाव्या वेतन आयोगातील पे बॅड रु.१५६००-३९१०० व ग्रेड पे रु. ५४००/- या वेतन संरचनेशी समकक्ष) कर्मचारी/

अधिकाऱ्यांना लागू राहील. संबंधित कर्मचारी/अधिकारी हे कोणत्याही कारणामुळे वेतनस्तर एस-२१ मध्ये वेतन आहरीत करु लागतील, तेव्हा त्यांना उपरोक्त नवीन योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा लेखा अधिकारी संवर्गात सरळसेवेने नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांची १० वर्षे नियमित सेवा पूर्ण झालेली आहे. सदर लेखा अधिकाऱ्यांना तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत अनुज्ञेयतेनुसार व पात्रतेनुसार सहायक संचालक संवर्गाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ हा शासन सेवेतील पहिला लाभ म्हणून त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र. - ६ मध्ये नमूद केलेल्या दिनांकापासून अनुज्ञेय करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिका-यांचे नाव | म. वि. व ले. सेवेतील लेखा अधिकारी संवर्गातील नियुक्तीचा दिनांक | लेखा अधिकारी पदावर १० वर्षे नियमित सेवा पूर्ण झाल्याचा दिनांक | म. वि. व ले.से. वर्ग -१ परीक्षा उत्तीर्ण केल्याचा दिनांक | तीन लाभांच्या योजनेंतर्गत प्रत्यक्ष लाभ अनुज्ञेय होण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्रीम.रोहिणी रतन बाड | ०३.०९.२०११ | ०३.०९.२०२१ | भाग- १ मे -२०२३<br>भाग -२ मे -२०२२ | ०३.०६.२०२३ |
| २ | श्रीम. माधुरी निवृत्ती बांदल | ०१.०१.२०१३ | ०१.०१.२०२३ | भाग- १ व भाग- २ ऑगस्ट - २०२१ | ०१.०१.२०२३ |
| ३ | श्री.प्रताप सुभाष भंडारे | ०१.०१.२०१३ | ०१.०१.२०२३ | भाग- १ व भाग- २ ऑगस्ट - २०२१ | ०१.०१.२०२३ |
| ४ | श्रीम. ज्योती मोहन गायवकवाड | ०१.०१.२०१३ | ०१.०१.२०२३ | भाग- १ व भाग- २ मे- २०२२ | ०१.०१.२०२३ |

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहायक लेखा अधिकारी संवर्गातून लेखा अधिकारी संवर्गात पदोन्नतीने नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांना शासकीय सेवेत रुजू झाल्यापासून कालबध्द पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना/ सुधारित आश्वासित प्रगती योजना यांचा यथास्थिती पहिला वा दुसरा लाभ अथवा कार्यात्मक पदोन्नतीचा लाभ मिळाला आहे. अशा अधिकाऱ्यांना अनुज्ञेयतेनुसार व पात्रतेनुसार सदरहू लाभ हा दुसरा वा तिसरा लाभ म्हणून अनुज्ञेय करण्यात येत आहे.

त्यानुसार पुढील तक्त्यात नमूद महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा अंतर्गत लेखा अधिकारी यांना नवीन तीन लाभांच्या आश्वासित प्रगती योजनेंतर्गत सहायक संचालक संवर्गाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ हा शासन सेवेतील पहिला / दुसरा/ तिसरा लाभ म्हणून त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.- ७ मध्ये नमूद केलेल्या दिनांकापासून अनुज्ञेय करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिका-यांचे नाव | म. वि. व ले. सेवेतील सहायक लेखा अधिकारी संवर्गातील नियुक्तीचा दिनांक | म. वि. व ले. से.संवर्गात आल्यानंतर मंजूर करण्यात आलेला पहिला/दुसरा लाभ | म. वि. व ले. सेवेतील लेखा अधिकारी संवर्गातील पदोन्नतीचा दिनांक | म. वि. व ले.से. वर्ग -१ परीक्षा उत्तीर्ण केल्याचा दिनांक | तीन लाभांच्या योजनेंतर्गत प्रत्यक्ष लाभ अनुज्ञेय होण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री. दिपक शंकरराव ठाकरे | २९.०६.२००४ | पहिला लाभ लेखा अधिकारी संवर्गाचा आप्रयो प्रत्यक्ष लाभ मंजूर दिनांक ०१.०१.२०१६ | २६.०४.२०१६ | भाग- १ व भाग- २ मे - २०२२ | २९.०६.२०२४ दुसरा लाभ |
| २ | श्री.विनोद शंकरराव खैरनार | २८.०६.२००४ | पहिला लाभ लेखा अधिकारी संवर्गाचा आप्रयो प्रत्यक्ष लाभ मंजूर दिनांक ०१.०१.२०१६ | २८.०४.२०१६ | भाग- १ व भाग- २ मे - २०२२ | २८.०६.२०२४ दुसरा लाभ |
| ३ | श्री. नंदकुमार दिनकर निकम | २७.१२.२००४ | पहिला लाभ लेखा अधिकारी संवर्गाचा आप्रयो प्रत्यक्ष लाभ मंजूर दिनांक ०१.०१.२०१६ | २०.०७.२०१७ | भाग- १ व भाग- २ मे - २०२२ | २७.१२.२०२४ दुसरा लाभ |
| ४ | श्री. अरुण प्रभाकरराव सोनुने | २३.०७.२००३ | - | ०७.०७.२०१४ | भाग- १ व भाग- २ मे - २०२३ | ०७.०७.२०२४ पहिला लाभ |
| ५ | श्री.रमेश पुंडलिक शिसव | २६.१२.२००८ | - | ०३.०७.२०१४ | भाग- १ व भाग- २ मे - २०२२ | ०३.०७.२०२४ पहिला लाभ |
| ६ | श्री.सुनिल शंकर जाधव | ०१.०७.२००४ | पहिला लाभ लेखा अधिकारी संवर्गाचा आप्रयो प्रत्यक्ष लाभ मंजूर दिनांक ०१.०१.२०१६ | ११.०४.२०१६ | भाग - १ ऑगस्ट - २०२१ भाग - २ मे - २०२२ | ०१.०७.२०२४ तिसरा लाभ |

जिल्हा परिषद सहायक लेखा अधिकारी संवर्गातून महाराष्ट्र वित्त व लेखा सेवाअंतर्गत लेखा अधिकारी संवर्गात पदोन्नतीने नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांना शासकीय सेवेत रुजू झाल्यापासून कालबध्द पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना/ सुधारित आश्वासित प्रगती योजना यांचा यथास्थिती पहिला वा दुसरा लाभ अथवा कार्यात्मक पदोन्नतीचा लाभ मिळाला आहे. अशा अधिकाऱ्यांना अनुज्ञेयतेनुसार व पात्रतेनुसार सदरहू लाभ हा दुसरा वा तिसरा लाभ म्हणून अनुज्ञेय करण्यात येत आहे.

त्यानुसार पुढील तक्त्यात नमूद लेखा अधिकारी यांना नवीन तीन लाभांच्या आश्वासित प्रगती योजनेंतर्गत सहायक संचालक संवर्गाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ हा शासन सेवेतील पहिला / दुसरा/ तिसरा लाभ म्हणून त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.- ७ मध्ये नमूद केलेल्या दिनांकापासून अनुज्ञेय करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिका-यांचे नाव | जिल्हा परिषद सहायक लेखा अधिकारी संवर्गातील नियुक्तीचा दिनांक | म. वि. व ले. से.संवर्गात आल्यानंतर मंजूर करण्यात आलेला पहिला/ दुसरा लाभ | म. वि. व ले. सेवेतील लेखा अधिकारी संवर्गातील पदोन्नतीचा दिनांक | म. वि. व ले.से. वर्ग -१ परीक्षा उत्तीर्ण करण्यापासून सूट मिळाल्याचा दिनांक | तीन लाभांच्या योजनेंतर्गत प्रत्यक्ष लाभ अनुज्ञेय होण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री.वसंत भिमराव जाधव | २५.०८.१९९८ | - | २५.०१.२०१० | ०६.०४.२०१३ | २५.०१.२०२० पहिला लाभ |
| २ | श्री. ज्ञानेश्वर वसंत सुळ | २०.०४.१९९९ | - | २५.०१.२०१० | ०५.१०.२०१३ | २५.०१.२०२० पहिला लाभ |

**अटी व शर्ती -:**

१. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि.०८.०६.१९९५ मधील अट क्र. २ (मा) : या योजनेंतर्गत अनुज्ञेय करण्यात आलेल्या लाभामुळे संबंधित अधिकाऱ्यांच्या जबाबदारी आणि कर्तव्यामध्ये वाढ होत नसली तरी नियमित पदोन्नतीप्रमाणे पदोन्नतीच्या पदाच्या वेतनसंरचनेत वेतन निश्चितीचा लाभ मिळेल. या योजनेंतर्गत वरिष्ठ वेतन संरचना दिल्यानंतर वेतननिश्चिती नियमित पदोन्नतीप्रमाणे होईल. मात्र त्याच वेतन संरचनेत नियमित/ कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यानंतर पुन्हा वेतन निश्चितीचा लाभ देय होणार नाही.

२. शासन निर्णय वित्त विभाग दि.०२.०३.२०१९ मधील अट क्र.(xx) (३) : या योजनेंतर्गत पहिला, दुसरा व तिसरा अथवा तिन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचा-यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील, तथापि अशा लाभांची वसूली करण्यात येणार नाही. तसेच असे लाभ काढुन घेतल्यानंतर संबंधिताची वेतननिश्चिती ही त्यांना जणू काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम १२ च्या तरतूदीनुसार करण्यात येईल.

३. शासन निर्णय वित्त विभाग दि.०२.०३.२०१९ मधील अट क्र.(xx) (२) : कार्यात्मक पदोन्नती नाकारली आहे. अशा अथवा कार्यात्मक पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचारी / अधिकारी यास भविष्यात होणाऱ्या / झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत, कार्यात्मक पदोन्नतीस पात्र ठरल्यास त्यास कार्यात्मक पदोन्नतीचा कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून १० वर्षाच्या नियमित सेवेनंतर, अन्य विहित अटी व शर्तींच्या पूर्ततेनंतर, या योजनेअंतर्गत यथास्थिती पहिला / दुसरा / तिसरा लाभ पात्रतेनुसार मंजूर करण्यात येईल.

४. या आदेशान्वये तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यांत आलेल्या अधिकाऱ्यांनी शासन निर्णय, वित्त विभाग पीएवाय-१०८२/सीआर/११००/(एक)/एसईआर-३, दिनांक ०६.११.१९८४ व वित्त विभाग, शासन परिपत्रक वेपूर -२०१९/ प्र.क्र.८ /सेवा-९, दि.२०.०२.२०१९ नुसार वेतन निश्चितीचा विकल्प द्यावयाचा असल्यास तो त्यांनी हे आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत द्यावा.

५. संबंधित कार्यालय प्रमुखांनी वरील अधिकाऱ्यांची पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचनेतील वेतन निश्चिती त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार करुन त्यांना या योजनेचा लाभ त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून अनुज्ञेय वेतनस्तरामध्ये देण्यात यावा. तसेच उपरोक्त अधिकाऱ्यांना सदर योजनेचा पहिला लाभ अनुज्ञेय होण्यापूर्वी ते वरिष्ठ वेतनश्रेणीत वेतन आहरीत करीत असल्याने वेतनिश्चिती करताना समायोजन करण्याची दक्षता घेणेत यावी.

६. सदरचे आदेश संचालनालयाच्या या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असल्यामुळे सदर आदेशाच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांच्या वेतननिश्चितीसाठी कार्यालय प्रमुख यांनी संकेतस्थळावरील प्रत ग्राह्य धरावी.

(दीपा देशपांडे)
संचालक, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-

१. सहसचिव, वित्त विभाग,मंत्रालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई ४०० ०३२
२. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.
३. सहसंचालक, लेखा व कोषागारे (सर्व)
४. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
५. आदेशातील नमूद अधिकाऱ्यांचे विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांनी सुधारीत वेतननिश्चितीबाबतची आवश्यक ती कार्यवाही करुन फरकाची रक्कम प्रदान / वसुल (लागू असेल तो) करावी.
६. कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालये (सर्व)
७. संबंधित अधिकारी यांना त्यांचे कार्यालय प्रमुखांमार्फत.
८. गोपनीय अहवाल कक्ष, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई
९. संबंधित अधिकारी यांची वैयक्तिक नस्ती.
१०. निवड नस्ती.